16 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत

# योजनांच्या अंमलबजावणीत विद्यापीठ सकारात्मक

## मनपा आयुक्त पी. शिवशंकर : विद्यापीठात नूतन जलशुद्धिकरण व बॉटलिंग प्रकल्पाचे उद्घाटन

प्रतिनिधी
कोल्हापूर

विविध शासकीय योजना आणि उपक्रमांच्या अंमलबजावणीत शिवाजी विद्यापीठाचे सकारात्मक योगदान कौतुकास्पद आहे, असे गौरवोद्‌गार महानगरपालिका आयुक्त पी. शिवशंकर यांनी काढले. विद्यापीठातील जलशुद्धिकरण व बॉटलिंग प्रकल्पाच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते.

शिवशंकर म्हणाले, शिवाजी विद्यापीठाने शासनाचे अनेक उपक्रम यशस्वारित्या राबवले आहेत. त्याचबरोबर आता आर. ओ. जलशुद्धीकरण प्रकल्प उभारून विद्यापीठ स्वच्छ पाण्याच्या बाबतीतही स्वयंपूर्ण झाले आहे. स्वच्छ पाणी हा सर्वांचा हक्क आहे, असे आपण म्हणत असलो तरी, विद्यापीठाने त्या दिशेने टाकलेले पाऊल अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. संशोधनाबरोबरच त्याच्या उपयोजनातही विद्यापीठ अग्रेसर असल्याची प्रचिती या प्रकल्पाच्या माध्यमातून आल्याचे शिवशंकर यांनी सांगितले.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, पाण्यावर सर्वांचा समान हक्क आहे आणि सर्वांना शुद्ध पाणी मिळायला हवे या उद्देशाने आर. ओ. जलशुद्धीकरण प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यापुढे विद्यापीठातील अधिविभाग, प्रशासकीय विभाग, अतिथीगृह, कॅन्टीन, वसतिगृहे आणि विद्यापीठ परिसरात असणाऱ्या अधिकाऱ्यांच्या निवासस्थानी आर. ओ. प्रकल्पातून शुद्ध पाणी पुरविण्यात येणार आहे.




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात जलशुद्धिकरण व बॉटलिंग प्रकल्पाचे उद्‌घाटन झाले. याप्रसंगी मनपा आयुक्त पी. शिवशंकर, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आदी मान्यवर.

यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी प्रकल्पाबद्दल माहिती दिली. ते म्हणाले, सुमारे ५००० लीटर प्रतितास इतकी उच्च शुद्धीकरण क्षमता असलेला हा प्रकल्प विद्यापीठाने स्वनिधीतून १७.५० लाख रुपयांत उभारला आहे. या जलशुद्धीकरण यंत्रणेबरोबरच सेमी-ऑटोमॅटिक प्रकारातील बॉटलिंग प्लँटही उभारण्यात आलेला आहे. या प्रकल्पाद्वारे विद्यापीठातील प्रत्येक घटकाला शुद्ध पाण्याची हमी मिळणार आहे.

यावेळी या प्रकल्पाचे ऑपरेटर वैभव कुलकर्णी यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. उपकुलसचिव डॉ. गिरीश कुलकर्णी यांनी आभार मानले. प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. आर.व्ही. गुरव, प्रभारी परीक्षा नियंत्रक जी.आर. पळसे यांच्यासह बिल्डींग वर्क्स कमिटीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

16 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सकाळ

# डिगे फाउंडेशनच्या पुरस्काराची घोषणा

## डॉ. शिंदे, मुश्रीफ, प्रा. भोजणे, कांबळे, रानगे यांचा समावेश



डॉ. शिंदे



हसन मुश्रीफ



नामदेवराव कांबळे



प्रा. भोजणे



बबन रानगे

कोल्हापूर, ता. १५ : माजी खासदार एस. के. डिगे मेमोरियल फाउंडेशनतर्फे देण्यात येणाऱ्या समाजरत्न भीमक्रांती पुरस्कारासाठी यंदा कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, आमदार हसन मुश्रीफ, सुवर्णपदक विजेते प्रा. आनंद भोजणे, अर्बन बँकेचे संचालक नामदेवराव कांबळे, मल्हार सेनेचे राज्याध्यक्ष बबन रानगे यांची निवड केली आहे. त्यांच्या नावांची घोषणा फाउंडेशनचे अध्यक्ष सदानंद डिगे यांनी आज पत्रकार परिषदेत केली.

आंबेडकरी समाजात उल्लेखनीय काम करणारे माजी कृषी अधिकारी शिवाजीराव वर्धन यांना धम्म प्रसारक पुरस्कार दिला जाणार आहे. या पुरस्कारांचे वितरण १३ एप्रिलला शाहू स्मारक भवन येथे होणार आहे. स्मृतिचिन्ह व मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२६ व्या जयंतीनिमित्त १२ ते १४ एप्रिल या कालावधीत भीम फेस्टिव्हलचेही आयोजन केले आहे. त्यामध्ये पुरस्कार वितरण, व्याख्यान, निबंध स्पर्धा, एकांकिका, आरोग्य शिबिर, भारतीय संविधानाची माहिती, शालेय विद्यार्थ्यांना साहित्य वाटप, अंध, अपंग मुलांना भोजन, प्रबोधनात्मक आतषबाजी, गरीब व अनाथांना साडी व भांडी वाटप, असे कार्यक्रम होणार आहेत.

एस. के. डिगे कोल्हापुरात मामलेदार म्हणून कार्यरत होते. स्वातंत्र्यानंतरच्या दुसऱ्या सार्वत्रिक निवडणुकीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शेड्युल्ड कास्ट फेडरेशनतर्फे डिगे यांना लोकसभेची उमेदवारी मिळाली. त्यावेळी डिगे यांना सर्वात जास्त मते मिळाली होती. त्यांच्या मृत्यूनंतर माजी खासदार एस. के. डिगे मेमोरियल फाउंडेशनची स्थापना केली. पुरस्काराचे हे पाचवे वर्ष आहे.

या वेळी प्रभाकर कांबळे, महादेव कांबळे, धोंडिराम कांबळे, अशोक भास्कर, प्रा. अतुल कांबळे, रूपाली कांबळे, दीपक कांबळे, हेमंत कांबळे, आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 JAN 2017

पुण्यनगरी

# कुलगुरू डॉ. शिंदे, मुश्रीफ यांना समाजरत्न भीमक्रांती पुरस्कार

कोल्हापूर / प्रतिनिधी :

डिगे फाऊंडेशनतर्फे दरवर्षी 'समाजरत्न भीमक्रांती' पुरस्कार दिला जातो. यंदा हे पुरस्कार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, आमदार हसन मुश्रीफ, सुवर्णपदक विजेते आनंद भोजणे, अर्बन बँकेचे नामदेवराव कांबळे; मल्हार सेनेचे बबनराव रानगे यांना जाहीर झाला आहे. १३ एप्रिल रोजी शाहू स्मारक भवन येथे पुरस्काराचे वितरण केले जाणार असल्याची माहिती सदानंद डिगे यांनी पत्रकार परिषदेत दिली.


डॉ. देवानंद शिंदे


हसन मुश्रीफ


आनंद भोजणे


नामदेवराव कांबळे


बबनराव रानगे

दरवर्षी माजी खासदार एस. के. डिगे मेमोरियल फाऊंडेशनच्या वतीने डिगे यांच्या जयंतीचे औचित्य साधून पुरस्कार देण्यात येतो. १२ ते १४ एप्रिल या कालावधीत भीम फेस्टिव्हलचे आयोजन केले आहे. त्यादरम्यान या पुरस्कारांचे वितरण केले जाणार आहे. माजी कृषी अधिकारी शिवाजीराव वर्धन यांना 'धम्म प्रसारक' पुरस्कार देण्यात येणार आहे.

व्याख्यान, निबंध स्पर्धा, एकांकिका, आरोग्य शिबिर, भारतीय संविधानाची माहिती, शालेय विद्यार्थ्यांना साहित्य वाटप, अंध व अपंग मुलांना भोजनदान, प्रबोधनात्मक आतषबाजी, गरीब व अनाथांना साडी व भांडी वाटप असे विविध कार्यक्रम राबविले जाणार आहेत.

प्रभाकर कांबळे, सचिव महादेव कांबळे, धोंडिराम कांबळे, अशोक भास्कर, अतुल कांबळे, रूपाली कांबळे, दीपक कांबळे, हेमंत कांबळे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

16 JAN 2017

लोकमत

# देवानंद शिंदे, हसन मुश्रीफ यांना डिगे फौंडेशन पुरस्कार

कोल्हापूर : माजी खासदार एस. के. डिगे मेमोरियल फौंडेशनच्यावतीने देण्यात येणारा यंदाचा 'समाजरत्न भीमक्रांती' पुरस्कार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, आमदार हसन मुश्रीफ यांच्यासह पाचजणांना जाहीर झाल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष सदानंद डिगे यांनी रविवारी पत्रकार परिषदेत दिली.

एस. के. डिगे यांच्या १०४ व्या जयंतीचे औचित्य साधून १३ एप्रिल २०१७ रोजी शाहू स्मारक भवन येथे दुपारी तीन वाजता डॉ. शिंदे, आमदार मुश्रीफ यांच्यासह सुवर्णपदक विजेते प्रा. आनंद भोजणे, कोल्हापूर अर्बन बँकेचे ज्येष्ठ संचालक नामदेवराव कांबळे, मल्हार सेनेचे सरसेनापती बबन रानगे यांना गौरविण्यात येणार आहे. त्याचबरोबर माजी कृषी अधिकारी शिवाजीराव वर्धन यांना





'धम्म प्रसारक' पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. १२ ते १४ एप्रिल या कालावधीत ' भीम फेस्टिव्हल', व्याख्यान, निबंध स्पर्धा, एकांकिका, आरोग्य शिबिर, भारतीय संविधानाची माहिती, शालेय साहित्य वाटप, अंध व अपंग मुलांना भोजनदान आदी कार्यक्रम घेण्यात येणार असल्याचे डिगे यांनी सांगितले.

यावेळी प्रभाकर कांबळे, महादेव कांबळे, धोंडिराम कांबळे, अशोक भास्कर , प्रा. अतुल कांबळे, रुपाली कांबळे, दीपक कांबळे, हेमंत कांबळे आदी उपस्थित होते.

16 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सकाळ

# सत्यशोधक चळवळ पुढे नेण्याची गरज

## तारा भवाळकर : प्रश्न महिलांचे, पुरुषांचे नसतात; समाजाचे असतात

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १५ : 'स्त्री सबलीकरणासाठी फुले दाम्पत्याने सुरवात केलेली चळवळ आजही पुढे नेण्याची गरज आहे. आजही स्त्री-पुरुष समानता खऱ्या अर्थाने वास्तवात आली का, याचा विचार करण्याची गरज आहे. प्रश्न केवळ महिलांचे किंवा पुरुषांचे नसतात. ते समाजाचे असतात. देवीच्या देवळात पुरुष पुजारी असतात, हे आजचे वास्तव आहे. देवीला साडी नेसवण्यासाठी स्त्री पुजारी का नाही?' असा परखड सवाल तारा भवाळकर यांनी केला.

सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठ सेवक संघातर्फे आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर अध्यक्षस्थानी होते.

डॉ. भवाळकर म्हणाल्या, "आजही सोवळं-ओवळं यामध्ये वावरणारा समाज स्त्रीचा वापर फक्त पूजेच्या पूर्वतयारीसाठी करून घेतो. पूजेचा मान स्त्रीला मिळायला हवा. काळाचे पडदे भेदून पुढे गेले पाहिजे. प्रश्न सोडविण्यासाठी स्त्री-पुरुषांच्या संयुक्त प्रयत्नांची आवश्यकता आहे. पुस्तकी वाचनाने माहिती मिळते; पण व्यावहारिक जाणिवेने ज्ञान मिळते. विद्यार्थ्यांनी ज्ञानसंपादनासाठी आजूबाजूची परिस्थिती अभ्यासावी. केवळ पूर्वजांच्या पराक्रमाचा मोठेपणा मिरवून प्रश्न सुटणार नाहीत, याचे भान ठेवावे."

डॉ. नांदवडेकर यांचे अध्यक्षीय भाषण, परीक्षा नियंत्रक डॉ. महेश काकडे यांचे भाषण झाले. संघाचे पदाधिकारी अतुल ऐतवडेकर, सुरेखा आडके, मिलिंद भोसले, विष्णू खाडे, अनिल साळोखे, अजय आयरेकर, महिला कर्मचारी, विद्यार्थिनी उपस्थित होत्या. रमेश पोवार यांनी प्रास्ताविक केले. रत्नमाला साळुंखे यांनी आभार मानले.